**<u>नियमित दरखास्त अर्ज क्र.३१/२०२३</u>**
**<u>जयश्री साठे वि. सर्जेराव यादव</u>**
**<u>निशाणी १६ वरील आदेश</u>**

१. दरखास्तदार यांनी प्रस्तुतची दरखास्त ही नि.दिवाणी दावा क्र.१५४३/२०२० (जुना दिवाणी दावा क्र.२७०/२०१९) मधील हुकूमनाम्याची बजावणी होवून मिळणेकरीता दाखल केला आहे. नियमित दिवाणी दावा क्र.१५४३/२०२० (जुना दिवाणी दावा क्र.२७०/२०१९) मधील हुकूमनाम्यानुसार मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेमार्फत दावा जमीन मिळकतींची मोजणी होवून अलग व पृथक कब्जा वाटून मिळणेकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ प्रमाणे प्रकरण पाठविणेत यावे अशी मागणी प्रस्तुत अर्जाद्वारे केली आहे.

२. जे.डी. १अ ते १–क व २ ते ६ प्रस्तुत दर्खास्तीची नोटीस मिळून देखील ते दरखास्तकामी हजर झाले नाहीत अथवा प्रस्तुत अर्जास देखील म्हणणे दाखल केले नाही त्यामुळे मुळ दरखास्त व प्रस्तुत अर्ज त्यांचे विरुध्द एकतर्फा चालविणेत आला.

३. दरखास्तदार यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. नियमित दिवाणी दावा क्र.१५४३/२०२० (जुना दिवाणी दावा क्र.२७०/२०१९) या वाटपाकरीताच्या दाव्यामधील निर्णयानुसार प्रस्तुत दाव्यातील हुकूमनाम्याप्रमाणे दावा मिळकतींच्या वाटपाकरीता मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे ***आण्णासाहेब राजाराम नागणे वि. राजाराम मारुत नागणे, २००१(३), एम.एल.जे.५३*** मधील निर्देशानुसार वाटपाचे काम मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. नियमित दिवाणी दावा क्र.१५४३/२०२० (जुना दिवाणी दावा क्र.२७०/२०१९) मधील हुकूमनाम्या प्रमाणे दावा जमीन मिळकतींचे वाटप दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ नुसार मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे पाठविणेत यावे.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2026.02.26 16:48:30 +0530

**(श्रीमती व्ही.डी.शिरसे)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा
ता.खानापूर, जि.सांगली.

स्थळ : विटा
दिनांक : २६/०२/२०२६